UGC Approved Online Journal (Sr.no 48178, 48818)
Impact Factor : 3.117 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5655
Aaarhat Multidisciplinary International Education Research Journal
{Bi-Monthly} Volume : VI Issue : V June – July 2017

# समाजभाषाविज्ञानातील प्रमुख संकल्पना

**डॉ. वेदश्री विजय थिगळे,**
**प्राचार्य,**
**कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे महाविद्यालय,**
**उत्तमनगर, सिडको, नाशिक – 422 009.**

'भाषा' हे माणसाच्या प्रकटीकरणाचं अत्यंत महत्वपूर्ण व सामर्थ्यशाली असे माध्यम आहे. भाषा एका माणसाच्या मनातले संदेश दुस–या माणसाच्या मनापर्यंत पोहचविते म्हणून ते संदेश वहनाचे देखील माध्यम आहे. भाषा हे संदेश वहनाचे आणि संपर्काचे महत्वपूर्ण कार्य करत असल्यामुळे तिचा संबंध माणसांशी, ही माणसं ज्या समाजात रहातात त्या समाजाशी, त्या समाजाच्या संस्कृतीशी येत असतो. कोणती भाषा केव्हा जन्मास आली हे आपल्याला सांगणे कठीण असते. भाषा कोणत्या क्षणी निर्माण झाली आणि कोणत्या क्षणी नष्ट झाली हे सांगणेसुध्दा खरं तर अवघड असते. तशी भाषा ही सतत आणि सर्वकाळ म्हणजे दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. खरं तर एका भाषेचा अंत आणि दुस–या भाषेचा जन्म असतो. यांची सीमारेशाही आपल्याला ठरविता येत नाही.पण मानवी जीवनातील तिचे महत्व अशावेळीही वाढलेलेच असते हे मात्र खरे. भाषेमुळेच या सर्व घटकांचा परस्परांशी संबंध येतो. भाषाया क्रियेत संपर्काचे, संदेष वहनाचे माध्यम तर असतेच पण भाषाप्रत्यक्षात कृतीसुध्दा करते.

मॅलिनोव्हस्की हा ब्रिटिश मानववंशशास्त्रज्ञ म्हणतो की, 'भाषाही एक सामाजिक व सांस्कृतिक जीवनामध्ये संपर्क क्रियेसाठी व सहकार्यासाठी आवष्यक असली तरी केवळ ती साधनीभूत नसून काही प्रसंगी ती प्रत्यक्ष कृतीसृध्दा करते.' या कृतीचा अर्थ व परिणाम जाणून घेण्यासाठी भाषेचा अभ्यास महत्वाचा ठरतो.

भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. तिची निर्मिती समाजासाठी व तिचा विकास समाजातच होत असतो. म्हणून समाजाच्या भाषेचा अभ्यास आवश्यक ठरतो. 'समाज' हा शब्द केवळ जातिसंस्थावाचक म्हणून लक्षात न घेता भौगोलिक, प्रांतिक, व्यावसायिक अशा कितीतरी प्रकारचे समूह म्हणजे तो समाजच असतो. प्रत्येक समाजाची खास, स्वतंत्र व वैशिष्टयपूर्ण भाषा असते. त्या भाषेचे व्यवहार व स्वरूप जाणून घेण्यासाठी तिचा शास्त्रीय अभ्यास होणे आवष्यक आहे.

20व्या शतकात विद्यापिठीय स्तरावर भाषेच्या अभ्यासाच्या विविध पध्दतींचा अभ्यास व संशोधन झाले. त्यात ऐतिहासिक, वर्णनात्मक पध्दती जषा आहेत तषी अलीकडे भाषेकडे सामाजिक दृष्टिकोनातून पाहणा–या

UGC Approved Online Journal (Sr.no 48178, 48818)
Impact Factor : 3.117 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5655
Aaarhat Multidisciplinary International Education Research Journal
{Bi-Monthly} Volume : VI Issue : V June – July 2017

अभ्यासशाखेचा उदय झाला आहे. तिला 'सामाजिक भाषाविज्ञान' असे म्हणतात.

सामाजिक भाषा विज्ञान म्हणजे भाषेचा सामाजिक दृष्टिकोनातून पाहणाऱ्या अभ्यास करणारी अभ्यासशाखा होय.

सामाजिक दृश्टिकोनातून भाषेकडे पाहणे म्हणजे भाषिकवर्तनाला प्रत्यक्ष परिस्थितीचा संदर्भ असतो. या संदर्भाचा अभ्यास करणे म्हणजे 'सामाजिक भाषाविज्ञान' होय. वुडथ आणि हॅलिडे यांनाही भाषेचा सामाजिक दृश्टिकोनातून अभ्यास व्हावा असा आग्रह ठरलेला आहे. त्यांनी आग्रह धरला कारण भाषाजी व्यक्ती बोलते तिच्या लकबी त्या भाषेतून प्रकट होतात. तसेंच तिचे तत्कालीन संदर्भ स्वरूपही लक्षात येते. भाषेशी या गोश्टी संबंधित असतात. भाषेचे वेगळेपण किंवा सौंदर्य प्रकट करणाऱ्या असतात. संदर्भ देणाऱ्या असतात. एकेकाळी या गोश्टींकडे दुर्लक्ष करून तिच्या केवळ आदर्श रूपाचाच अभ्यास करावा असे डर्क हाईम व सोस्यूर यांचे मत होते. परंतु कर्थ आणि हॉलिडे यांच्या या नव्या सामाजिक दृष्टिकोनातील अभ्यासाच्या आग्रहामुळे त्यांचे मत मागे पडले. भाषेच्या संदर्भातील अभ्यासात सामाजिक प्रक्रिया महत्वाची मानली गेल्यामुळे या अभ्यासशाखेला सामाजिक भाषाविज्ञान किंवा समाजभाषाविज्ञान असे संबोधण्यात आले. लोक वापरणा–या भाषेचा अभ्यास सामाजिक भाषाविज्ञानात होत असल्याने त्याला 'समाजभाषाविज्ञान' असे म्हणतात.या अभ्यास पध्दतीमुळे त्या त्या समाजाच्या भाषेचा त्या समाजाची वैशिष्टये, समाजाची रचना, त्यातील वर्गरचना, जात, धर्म, सामाजिक, सांस्कृतिक मूल्ये, भाषिकअस्मिता यांचे व्यक्तिकरण झाले आणि भाषिकलोकशाही अस्तित्वात आली असे म्हणता येईल. प्रत्येक व्यक्ती आणि समाज व समाज घटकांनुसार भाषावेगळी ठरते. भाषा व्यवहार वेगळे ठरतात, म्हणून भाषेचा सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास वैशिष्टयपूर्ण ठरतो.

- **समाजभाषविज्ञानातील काही प्रमुख संकल्पना** :
  - **भाषिक सापेक्षवाद** :

    भाषा स्वभाषा किंवा परभाषा असो तिचे मानवी जीवनातील तीन प्रकारचे कार्य अशोक केळकर यांनी स्पष्ट केले.

    1. उपयुक्ततेचे वळण : उपयोजन – व्यावहारिक.
    2. सामाजिकतेचे वळण : सामाजिक स्वरूप.
    3. सांस्कृतिकतेचे वळण : सांस्कृतिक स्वरूप.

1. **उपयुक्ततेचे वळण** :

माणूस ज्या परिसरात राहतो, घरात राहतो तो परिसर आणि घर हे मानवनिर्मित असते. माणसाच्या जगतांना काही गरजा निर्माण होत असतात. त्या गरजा भागवतांना तो परिसर लक्षात घेवून भाषायोजिली जाते. उदा.

राणी – आई, मी निघाले गं ऑफिसला..!

आई – राणी ऑफिसला निघालीस का? पाऊस आहे कां बाहेर? दादा, राणीची गाडी काढून दे तिला ! आणि बाबांना छत्री दे निघतांना.

राणी – नको गं आई! आज मी लवकर निघाली आहे, बाबांना आधी सोडते त्यांच्या कार्यालयात अन् मग मी पुढे जाते.

आई – हं ! तसेच कर आणि संध्याकाळी जर पाउस तर येतांना घेवूनही ये.

राणी – आई.....! हो गं...चल बाय ! बाबा चला ना लवकर...

याठिकाणी परिसर बघून तिची उपयुक्तता ठरवून भाषा योजिली आहे. तेव्हा जशी गरज असेल तसे भाषेला वळण दिले जाते. या परिसरातही प्रत्येकाची भाषाउपयोजन पध्दती सापेक्ष असेल, भाषिकरचना सापेक्ष असेल. ती शब्दसंग्रह, लिंग, उच्चारण, परिसर, आवष्यकता या गोष्टींवर अवलंबून असेल.

**2. सामाजिकतेचे वळण** :

माणूस केवळ अन्नावर जगत नाही, त्याला सहवासाचा आनंदही हवा असतो. मूळातच माणूस हा समाजप्रिय माणूस आहे. तो प्राचीन काळापासून एकटा राहत नाही, टोळी करून राहतो. यातच त्याची सामाजिकता दडलेली आहे. सहवासातूनच नाती जुळतात. ज्यांचा सहवास त्यांच्याषी नाती जुळतात, इतरांषी नाही. मग ते नाते असलेले, नाते नसलेले, एकाच गटात असलेले किंवा नसलेले असे सामाजिक गट पडत जातात. प्रदेशानुसार एकत्र किंवा वेगळे वेगळे होतात, एकत्र येतात व यातूनच प्रादेशिक अस्मिता निर्माण होते तर कधी विलगता येते. यातूनच त्या त्या प्रकारची सामाजिक जडणघडण होते. या जडण घडणीत भाषेचा मोठा वाटा असतो. प्रत्येक टप्प्यावर भाषेची मदत होते. सामाजिक स्तरावरची भाषाही सापेक्ष ठरते. भाषाबोलणारा महत्वाचा घटक म्हणजे जीभ (Tongue). आणि तो प्राण्यांसारखाच माणसाजवळ निर्सदत्त असतोच पण खाण्यापलीकडे त्याचा बोलण्याचा उपयोग केवळ माणूस हाच प्राणी करू शकतो. कारण तो समाजात राहतो आणि परस्परांषी संवाद ही त्याची अन्नाइतकीच महत्वाची गरज आहे.

UGC Approved Online Journal (Sr.no 48178, 48818)
Impact Factor : 3.117 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5655
Aaarhat Multidisciplinary International Education Research Journal
{Bi-Monthly} Volume : VI Issue : V June – July 2017

भाषेचा आविश्कार होतांना बोलणाऱ्याच्या साधारणतः दोन सापेक्ष प्रवृत्ती आपल्याला दिसतात. पहिली प्रवृत्ती जाणवते ती अषी की, ' बोलणारा समाजजीवनातील भाषेची निरनिराळी रूपे आणि त्या रूपांची विभाजने करतो. त्यामुळे त्याच्या भाषेत विविधता येते पण ती त्याची सापेक्ष भाषाही असते' एकाच वेळेला ती भाषाम्हणजे त्याची प्रकटीकरणाची स्वतःची शैली आणि दुसऱ्या बाजूला त्या भाषेत येणारी विविधता, भाषेचे होणारे विकेंद्रीकरण, त्या भाषेत येणारे प्रदेषागत,जातिगत,पिढीगत बदलते आणि नवे संक्रमण झेललेले भाषेचे रूप.हे भाषेत भेद निर्माण करण्याची कारण ठरतात. दुसरी प्रवृत्ती जाणवते ती अषी की बोलली जाणारी भाषात्या संस्कृतीषी एकरूप राहू पाहते. विविध प्रकारच्या प्रदेषाला आणि पिढयांना सांस्कृतिक दृश्टया जोडू पाहते.

### 3. सांस्कृतिकतेचे वळण :

समाजातच संस्कृती टिकून असते आणि ती टिकविण्याचा प्रयत्न माणूस करत असतो. ती संक्रमित करण्याचे अत्यंत महत्वाचे साधन म्हणजे भाषाअसते. याच भाषेतून आपण आपल्या पुढच्या पिढीला जगण्याचा आपल्या रूढी परंपरा,चालिरीती,देव, देवता, सण, उत्सव, कुळाचार वगैरे म्हणजे संस्कृतीचा परिचय करून देत असतो.पुढची पिढीही जमेल तसे अनुकरण करती येईल तसे भाषाउपयोजन करत असते. लहानपणी आपली भाषेषी जणू क्रीडाच चाललेली असते. नवीन शब्द, त्याचा उच्चार आणि अर्थ आपण परिसरातून घेतो लक्षात ठेवतो. खुणा, चिन्ह यांचा वापर करूनही तो स्मरणात ठेवतो. उदा. दोन पायांवर चालणारा माणूस आणि दोन पाय असून उडणारा पक्षी. चार पाय असेलेला पषु अशा काही खुणा लहानपणी आपण लक्षात ठेवतो मोठेपणी विसरतो असे म्हणता येणार नाही पण इतकया बाळबोध खुणांचे पुन्हा पुन्हा स्मरण करण्याची त्याला गरज राहत नाही. 'प्रौढत्वी निज शैषवास जपणे हा बाण कवीचा असे' अषी वृत्ती असलेल्या कवीमनात मात्र अषा काही खुणा घर करून असतात. प्रत्येक शब्दांची एक सांकेतिक आणि अर्थाच्या दृश्टीने एक सांस्कृतिक व्यवस्था असते असे म्हणता येईल. योग्यवेळी आपण तिचा वापर करीत असतो. घर आणि देउळ यांच्या परिसरात आणि संस्कृतीतला फरक आपण जाणतो आणि तषी भाषायोजत असतो.

एकूणच भाषाही माणसाची केवळ जाणीव वाढवत नाही तर ती जाणिवांची जाणिव करून देते. म्हणजेच त्याचे आत्मभान सतत जागवते आणि ते तसे जागृत झाले म्हणजे उपयुक्ततेच्या वळणावर मूक नैपूण्य आणि कारीगिरी यांचे तंत्रज्ञान बनते, सामाजिकतेच्या पातळीवर परंपरेमध्यल्या शहाणपणाचे सामाजिक नियोजनाचे चातुर्य बनते,सांस्कृतिकतेच्या पातळीवर जात्यावर सुचणा—या ओव्यांच्या आणि व्यवहारचातुर्याच्या म्हणींच्या जागी अर्थघन काव्य आणि विचानघन सूत्रे,त्यांचे विवेचन ही फुलतात.

- **भाषिक वर्तन** :

एका महाविद्यालयात एक परप्रांतीय महिला प्राध्यापक होती. ती जर्मन भाषा शिकवी. परंतु बोलतांना इंग्रजीचाच वापर अधिक करत असे. स्टाफ मिटींगच्या वेळी ती सहवासाने शिकलेल्या मराठी भाषेचा वापर करत असे. त्यावेळी तिच्या भाषिकवर्तनातला फरक जाणवत राही. तिला मराठीतील लिंगव्यवस्था परिचित नाही. वय, पद यानुसार दिली जाणारी आदरव्यवस्था परिचित नाही. त्यामुळे ती पुरूशांनाही म्हणायची, ये तू बोल ना! अशी कां बसलीस! यावेळी लोक हसायचे. बायकांना कधी कधी म्हणायची, ये सायना तू माझाबराबर येतोस कां? हे तिच भाषिकवर्तन वेगळे ठरायचे. कारण तिच्या भाषिक वर्तनात खूप बदल होत असे. तिला इथला भाषेवर असलेला सामाजिक प्रभाव परिचितच नव्हता. तिची भाषाभिन्नता हाही तिच्या भाषिकवर्तनाला निश्चित करतो. त्यामुळे लिंग, धर्म आणि जातीनुसारही भाषिकवर्तन ठरते. म्हणजेच भाषिकवर्तनाच्या मुळाशी सामाजिकता आहे हे आपल्याला मान्य करावे लागते.

- **लघु क्षेत्र** :

भाषाही सामाजिक संस्था असल्याने समाजानुसार भाषाभिन्नता आढळते. प्रत्येक स्तरानुसार तिच्या उपयोजनात विविधता येते. तिचे रूप व अर्थदृश्टया वेगळेपण जाणवते. या वेगळेपणाचा अभ्यास मॅलिनोव्हस्की, ग्लीसन, व्होर्प, सपीर, फर्थ, हॅलिडे यांनी केलेला आहे.

प्रत्येक समुहात, गटात भाषेचे संदेशवहनात्मक स्वरूप भिन्न किंवा त्या त्या समूह सापेक्ष असते. तिच्या त्या भिन्न प्रकटीकरणामागे भाषेची संदेशवहन क्षमता (Communicative Competency) असे म्हणतात. हाईमस्च्या मते ती संदेषनाची क्षमता आहे. हे संदेषन समाजसापेक्ष असते. भाषेच्या देवाणघेवाणीत समाज महत्वाचा ठरतो. या समाजातही आणखी छोटे छोटे लघु समाज असतात किंवा समूह असतात किंवा विशिष्ट कार्याच्या स्वरूपामुळे त्यांचे गट, प्रकार पडलेले असतात. या सर्व गटांची एक स्वतंत्र भाषा असते. शिवाय त्या भाषाप्रकटीकरणाची एक पध्दतही असते. याच भाषेच रूप, अर्थ, उच्चार यात भिन्नता असते. या गटांना, लघूसमूहांना भाषेची लघुक्षेत्र असे म्हणतात. उदा. कुटुंब, व्यवसाय संस्था, षिक्षणसंस्था, प्रषासन, मित्र मंडळी ग्रुप, कॉलेजच्या कट्टयावरील ग्रुप, डान्सचा ग्रुप, कार्यालयीन ग्रुप, अषी विविध लघुक्षेत्रे अस्तित्वात असतात.

- **लघुक्षेत्रीय भाषेचे वेगळेपण** :

प्रत्येक लघुक्षेत्राची भाषावेगवेगळी असते. कधी कधी शब्द एक असले तरी त्याला संदर्भ भिन्न असतात. ते ते संदर्भ त्या त्या लघुक्षेत्रापुरते मर्यादित असतात. त्याचा प्रसार व प्रचार झाला तर लघुक्षेत्र विस्तारते पण

अतिव्यापक स्वरूप प्राप्त होणे कठीण असते. उदा. कॉलेज कट्टयावरील भाषा बिनधास्त असते. या कट्टयावरील संदर्भही वेगळे असतात. 'श्यामसुंदर' आहे, दिसायला उत्तम, उंची उत्तम, डोळे घारे, राहणी उत्तम पण फक्त त्याच्या नाकाला थोडासा बाक आला आहे आणि ते नाक पोपटाच्या चोचीसारखे दिसते, म्हणून सगळे त्याला ष्यामसुंदर अषी हाक न मारता 'पोपट' म्हणतात. सगळेजण त्याला पोपट म्हणून ओळखतात. कारण 'पोपट षिकविले तसेंच बोलतो' येथे पोपट या नावामागचे गटानुसार अर्थाचे संदर्भ बदलतात. म्हणूनच त्या त्या क्षेत्राती संदर्भ जाणून घ्यावे लागतात.

कॉलेज कट्टयावरचे जग, ग्रुप, भाषा, घटना, यात सातत्याने बदल होत राहतात. येथे निर्माण झालेले संकेत, शब्द, संदर्भ, अर्थ, दीर्घकाळ राहतील याची खात्री नाही. त्यांचे अस्तित्व कमी कालावधीचे असते. कट्टा बदलला तरी सगळे संकेत बदलतात. या कट्टयावरील मुलांच्या भाषेत नव्याने आलेले शब्द बघू या.....

चिरीमिरी (अल्पसें), राढा (गोंधळ), रापचिक (मस्त), कोकोनट ट्री (बारीक शरीराची पण छाती मोठी असलेली मुलगी), कंदील (चश्मा असलेला मुलगा किंवा मुलगी), एरियल (जाणवं घातलेला ब्राह्मण विद्यार्थी), एअरपोर्ट (टकल्या), घाशीराम (तेच तेच बोलणारा). मुले विविध क्रियापदे योजतात पण नेहमीच्या अर्थापेक्षा यांच्या क्रियापदांचा अर्थ काही वेगळाच असतो आणि तो त्यांच्या ग्रुपला माहितही असतो. त्यामुळे त्यांची भाषात्यांनाच अधिक कळते. उदा. काही क्रियापदे : गिअर टाकणे (निघून जाणे), पटकून टाकणे (मारून टाकणे), काषी कर (काहीही कर, मला सांगू नको), मापं काढणे (टिंगल, चेश्टा करणे), थर्ड मारणे (टाळणे), शाळा करणे (लावालावी करणे)

- **भाषासंपर्क :**

भाषाम्हणजे संदेष वहन. भाषेचेच एक रूप असलेली बोली, ती ही संदेषवहन करते. हे संदेशवहन करण्याचे माध्यम म्हणजे 'वाणी' म्हणजे ध्वनीरूप बोलणे. प्रत्येक भाषेला एक भाषिकसमाज असतो. समाजातील लोक परस्परांशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे या भाषेतून संपर्क साधत असतात.

एकाच भाषेतल्या समाजाला परस्परांशी संपर्क साधणे सुलभ होते. उदा. मराठी भाषिक समाज मराठीतून सुलभपणे परस्परांषी संपर्क साधू शकतो. मुंबईचा माणूस नाषिक, पुणे, नांदेड, कोल्हापूर, नागपूरच्या लोकांषी मराठीतून संपर्क साधतो, कारण हे सगळे मराठी बोलतात, उपयोजतात. पण बंगलोरमध्ये, कर्नाटकमध्ये राहणा–या लोकांषी जे मराठी बोलतात त्यांच्याशी या माणसाचा संपर्क होईल व ते लोकही मराठी समाजाचे होतील. परंतु तमिळी व कर्नाटकी यांच्याषी मराठीतून संपर्क झाला नाही तर ते मराठी समाजाचे नसतात. हे खरे आहे, पण अलिकडे इतर प्रांतातून आलेले मराठी समाजात नसलेले लोक मराठी षिकतात, बोलतात आणि इतर

UGC Approved Online Journal (Sr.no 48178, 48818)
International Innovative Journal Impact Factor (IIJIF) Impact Factor : 3.117 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5655
Aaarhat Multidisciplinary International Education Research Journal
{Bi-Monthly} Volume : VI Issue : V June – July 2017

मराठी माणसांषी मराठीतून संपर्क साधतात. त्यामुळे आज मराठीचे संपर्क क्षेत्र विस्तारले आहे असे म्हणता येईल.

परदेषातील आपली मंडळी अजूनही मराठीतून संपर्क साधत आहे म्हणून ते मराठी भाषिकव समाजाचे घटक आहेत. पण तेथील इतर भाषिकतिथल्या स्थानिक व्यक्तींषी मराठीतून संपर्क होत असला तरी ते मराठी भाषिकसमाजाचे घटक होत नाही. त्यांना मराठी भाषातात्पुरती बोलता येत असते. प्रासंगिकच मराठी भाषेचे ते उपयोजन करत असतात पण मराठी भाषेच्या अर्थ प्रक्रियेचा, संस्कृतीचा त्यांचा सखोल अभ्यास नसतो. ते जन्मतः मराठी नसतील. म्हणून ते केवळ भाषासंपर्क क्षेत्रात येतात. त्यांचा समावेष मराठी भाषिक समाजात होईलच असे नाही.

भाषा कशासाठी वापरली यावरून केलेल्या भेदास 'भाषावापर शैली' असे म्हणतात. त्याला इंग्रजीत 'रजिस्टर' असे म्हणतात. सामान्य माणसाला रूपिम, स्वनिय, पदम् अषा संज्ञा कळणार नाहीत आणि तो वापरणारही नाही. पण अभ्यासकांना भाषावापरशैली शक्य आहे. भाषा बोलणारा भाषक हा एकाच किंवा अनेक भाषा समाजाचा घटक असतोच असे नाही. तो लहान–लहान भाषिक समाजाचा घटक असेलही. कारण आपण अनेक भाषाबोलतो. आपण हिंदी बोलणा–या गटात गेलो तर आपण हिंदी बोलतो, नव्हे तसे भाषिक वर्तनही करतो. हिंदी भाषेतून त्यांच्याषी संपर्क साधत असतो. आपली काही उद्दीश्टये साध्य करण्यासाठी सतत हे बदल घडवून आणतो. समाजात अनेक भाषिक गट असतात. त्यामुळे सगळयाच भाषिकगटांषी आपला संपर्क नसतो. आपल्या इच्छेनुसार, उद्दीष्टांनुसार आपण संपर्क साधतो म्हणजे आपले भाषा संपर्क क्षेत्र तसे मर्यादितच राहते. भले ही त्यांची उच्चारण पध्दती, वर्ण उच्चारण बदल वेगळे असतील तरी ते परस्परांच्या भाषासंपर्कात असतात.

भाषा एकच असली तरी तिचे संपर्क क्षेत्र व व्यक्ती विविध असतात. खाजगी क्षेत्रात दोन भाषक कसे बोलतात किंवा आपण घरात बोलतो, मित्रांशी बोलतो किंवा अगदी खाजगी गटात बोलतो तसे व्यासपीठावरून बोलत नाही. आपण कुठे बोलत आहोत याचे भान ठेवणे 'भाषा संपर्कात' महत्वाचे ठरते. काय बोलायचे? किती बोलायचे? कोणाशी बोलायचे? अन् कसे बोलायचे हे भाषासंपर्कात महत्वाचे असते.

एका व्यवसायात वापरली जाणारी भाषाही त्या व्यवसायातील लोकांची भाषावापर शैली असते. कारण या व्यवसायातील त्यांचे तांत्रिक शब्द, त्यांचे अर्थ ते जाणून असतात. समजा शिक्षण क्षेत्र असेल तर हजेरीपत्रक, वेळापत्रक, डस्टर, चॉक, बोर्ड, नकाशे, पाठय किंवा क्रमिक पुस्तक, संदर्भ, उद्‌बोधनवर्ग, मृदूकौषल्ये, सहावा वेतन आयोग,असे शब्द त्यांची भाषावापर शैली दर्षवितात.

- **वाचापालट :**

**'वाचा पालट'** भाषासंपर्कात होतच असतो. माणसाची 'वाचा' बदलते म्हणजे माणूस कधी कधी साधे, नेहमीचे शब्द बोलण्याऐवजी पारिभाषिकशब्द वापरून भाषावापर शैली बोलू लागला तर 'वाचा' बदल झाला किंवा

'वाचापालट' झाला असे म्हणता येईल. इंग्रजीमध्ये 'वाचा' या साठी **CODE** असा शब्द योजलेला आहे. बोलतांना होणा–या पालटांना आपण वाचा पालट असे म्हणू किंवा भाषापालट असेही म्हणता येईल.

डॉ.रमेष धोंगडे यांनी त्यांच्या सामाजिक भाषाविज्ञान या पुस्तकात वाचापालटाचे एक उत्तम उदाहरण सांगितले आहे, ते उदाहरण मूळचे डेनिसनया भाषावैज्ञानिकाचे आहे. इटलीमध्ये सौरिस हे गाव आहे.या गावचे लोक दिवसातून कितीतरी वेळा वाचापालट करतात. हे लोक घरात जर्मन भाषेत बोलतात. गावात गेले की इटलीची एक बोली असलेली सौरियन भाषाबोलतात. बाहेरून आलेल्या माणसांषी प्रमाण इटालियन भाषेत बोलतात. त्यामुळे दिवसभरात प्रसंग, परिस्थिती, स्थळ आणि व्यक्तीनुसार त्यांचा 'वाचापालट' होत असतो.

आपल्याकडेसुध्दा आपण घरात बोली भाषावापरतो. त्यातील वाक्यरचना आपली छोटया छोटया वाक्यांची किंवा हो, नाही, जा, ये, खा, बसे अशा एका शब्दांचीही असते. कार्यालयात काम करणा–या व्यक्ती कार्यालयीन भाषावापरतात जसे, फाईल, लेटर, पत्र, टाईप करून टाका, जावक नंबर घाल, प्रिंट द्या, लेटरहेडवर टाईप करा, सही आणा, खतावणी लिहा, बील करा, पावती लिहा असे शब्द वापरतील. वक्ते प्रमाण भाषावापरतील. परप्रांतीय असतील तर त्यांची त्यांची भाषा बोलतील असे 'वाचापालट' दिवसभरात होत राहील.

- **उसनवारी :**

उसनवारी म्हणजे एकाने दुस–याकडून काही घेणे. भाषेतील उसनवारी म्हणजे एका भाषेच्या व्यक्तीने दुस–या भाषेतील काही शब्द घेवून बोलणे. अलिकडे ही उसनवारी खूपच वाढली आहे. ही उसनवारी सराईतपणे सर्रास केली जात आहे. मराठी भाषिकअनेक शब्द हिंदी व इंग्रजीकडून उसने घेउन बोलतात. उदा. मला **पिरीयडला** बसायचे आहे, हे पाणी **ड्रिंकेबल** नाही, **चॉक** कसा तुटला? **इंटरनेट** बंद आहे, निघू या ना, **वेटिंग** कषासाठी?

कधी कधी परिभाषानिष्चित करतांना दुस–या भाषेतून काही शब्द उसनेही घेतले जातात आणि ते तसेच्या तसे आपल्या भाषेत लिप्यंतर करून वापरले जातात. उदा. लिटर, मिटर, केबल, प्रोटॉन, न्यूटॉन किंवा काही वेगळया भाषेतील शब्द घेवून त्यांचे आपल्या भाषेषी मिळते जुळते असे रूपही तयार केले जाते. उदा. Mercunization साठी आपण मर्क्युरन, electroni साठी इलेक्ट्रांनी, decarbanization साठी विकार्बनन वगैरे आपण शब्द वापरतोच जॉन गिल्स म्हणतो की, 'एकच भाषायेणा–या माणसाच्या बोलण्यात उसनवारी आढळते. ही उसनवारी कधी कधी इतकी त्या भाषेत मिसळून जाते की तो शब्द उसना असे वाटत नाही. '

नितीन मोरे यांनी मराठी माणसांचे संभाषण, त्यांचे पत्र लेखन यावर संषोधन केले आहे. त्यांच्या मते, गृहिणी या भाषेची सरमिसळ करतात. पुरूश वाचापालट जास्त करतात. विद्यार्थ्यांपेक्षा नोकरमाणसेही वाचापालट जास्त करतात. इंग्रजी माध्यमातून षिकलेल्या स्त्रियाही वाचापालट अधिक करतात. कोणत्या विशयावर कोण

UGC Approved Online Journal (Sr.no 48178, 48818)
Impact Factor : 3.117 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5655
Aaarhat Multidisciplinary International Education Research Journal
{Bi-Monthly} Volume : VI Issue : V June – July 2017

कोणाषी बोलतं आहे त्यावरून वाचापालट सरमिसळ आणि उसनवारीचे प्रमाण ठरते.

- **वाचा सरमिसळ :**

वाचा सरमिसळ होण्यासाठी ती व्यक्ती द्विभाषक असावी लागते. वाचा सरमिसळ मूळच्या भाषेत समरस होत नाही. मिसळ जाणवतेच.जेव्हा दोन व्यक्तिंमध्ये एका विषयावर संभाषण चालू असते त्यावेळी त्यांच्यात विशयही बदललेला नसतो. पण बोलणारा मात्र दोन भाषाएकत्रित करून बोलत असतो, त्याला 'वाचा सरमिसळ' असे म्हणतात, याला 'भाषासरमिसळ' असेही म्हणतात. कधी कधी व्यक्ती दोन बोली एकत्र करून बोलतात त्यावेळी 'वाचासरमिसळ'होते. उदा. पुढील संवाद बघा :

अनंत : काय विनोद, फलॅट घेतोय वाटतं?

विनोद : हो.. पण..... रेट तर गगनालाच भिडलेत.........

अनंत : काय स्क्वेअरफूट म्हणतो रे.......?

विनोद : अरे फोर थाउजन्ड!

अनंत : काय, कितव्या फलोअरवर, कोणता फलॅट घेतो?

विनोद : थर्ड फलोअरवर, थ्री बीएचके, लिफ्टची सोय आहे.

अनंत : बाप रे! आणि त्यावर स्टॅम्प डयूटी, एलबीटी, लिफ्टचे मेन्टेनन्स, म्हणजे खूपच महाग जाणार रे.... विनोद : हो ना! म्हणूनच डिसाईड होत नाही रे!

अनंत : कॅन्सल करतो की काय?

अनंत : नो, नेव्हर!

या संवादात कितीतरी इंग्रजी शब्द, नव्या संज्ञा आलेल्या आहेत. कितव्या फ्लोअरवर, लिफ्टचा मेन्टेनन्स, लिफ्टची सोय हे शब्द मराठी वाक्यातलेच येतात. त्यामुळे इथे वाचा सरमिसळ फार मोठया प्रमाणात होते. आपण पत्रलेखनात ही भाषासरमिसळ करतो. आपली खाजगी पत्रे किंवा इंटरनेटवरून पाठविलेली इ–मेल लिपी इंग्रजी पण शब्द मराठी, अर्थ मराठी किंवा कधी देवनागरी लिपीतून, (युनीकोडचे मराठी फॉन्ट वापरून पाठवतो) सुध्दा भाषा सरमिसळ करून पाठविली जाते. भाषा सरमिसळीचे प्रमाण सध्या वाढतेच आहे. एका देषातला प्राध्यापक दुस–या देशातील आपल्या मित्राला आपली प्रगती कळवितांना ब–याच भाषा सरमिसळ करतो.

उदा. 'मी थेसिस सबमीट केला आहे.,'मला लवकरच पीएच.डी डिग्री मिळेल'., 'सध्या रिसर्च पेपरचे लेखन चालू आहे.,'दोन आंतरराश्ट्रीय सेमीनार्सना जाणार आहे. ,पेपर प्रेझेंट करायचा आहे. इंग्रजीतून शिकलेले लोक मराठी बोलतांना, लिहितांना इंग्रजीतील शब्दच खूप वापर करतांना दिसतात. हल्ली भाषासरमिसळीची फॅशनही आहे. मुंबईच्या 'भाई' लोकांची भाषाही भाषासरमिसळचे उत्तम उदाहरण आहे

वाचापालट, भाषासरमिसळ, उसनवारी, भाषा वापर शैली हे सारे त्या बोलणा–या माणसावर अवलंबून नसते तर तो कशाविषयी आणि कशासाठी बोलतो यावर भाषावापर शैली अवलंबून असते. भाषा वापर शैली ही कार्यक्षेत्रानुसार बदलती असते. कधी कधी तिचा अतिरेकही होतो, त्यावेळी भाषा क्लिष्ट होते. काही लोक विद्वत्ता प्रदर्शनासाठी भाषावापर शैलीचा उपयोग करतात.

संदर्भ :

1. आधुनिक भाषाविज्ञान (संरचनावादी आणि सामान्य), संपादक डॉ. कल्याण काळे, डॉ. अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, पुणे ऑगस्ट 1999.
2. सुबोध भाषाशास्त्र, प्र. न. जोशी, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती नोव्हेंबर 1998
3. वैखरी, अशोक केळकर, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती मे 2007.
4. मराठीचा भाषिक अभ्यास, स्नेहवर्धन पब्लीशींग हाउस पुणे, जानेवारी 1994.
5. भाषा आणि भाषाविज्ञान, डॉ.रमेष धोंगडे, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि. पुणे, जानेवारी 2006
6. सुलभा भाषाविज्ञान, डॉ. दत्तात्रय पुंड, डॉ. कल्याण काळे, स्नेहवर्धन पब्लिशींग हाउस पुणे, फेब्रुवारी 1996
7. आधुनिक भाषाविज्ञान : सिध्दांत आणि उपयोजन, लोकवाड्.मय गृह, मुंबई डॉ. मिलींद माळशे, 4 थी आवृत्ती 2009
8. मराठीचे ऐतिहासिक भाषाशास्त्र, डॉ. र .रा. गोसावी, स्नेहवर्धन पब्लिशींग हाउस पुणे, जुलै 1999.
9. निवडक भाषा आणि जीवन, संपादक : कल्याण काळे, मृणालिनी शहा, मेहता पब्लिशींग हाउस, पुणे. प्रथमावृत्ती सप्टेंबर 1988.